**ठळक बातम्या**

- राज्याच्या विविध भागात केंद्रीय पथकानं केली अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदार महायुतीलाच कौल देतील असा मुख्यमंत्र्यांना विश्वास

- अमूल आणि इफको या भारताच्या सहकार क्षेत्रातल्या कंपन्या जगातल्या अग्रगण्य सहकारी संस्थांमधे पहिल्या दोन क्रमांकांवर

- क्यूएस जागतिक विद्यापीठ क्रमवारीत आशिया विभागात आयआयटी दिल्लीला देशस्तरावर पहिलं, तर जागतिक स्तरावर ५९वं स्थान

**आणि**

- मुंबई विमानतळावरच्या कारवाईत मोठ्या प्रमाणात अंमलीपदार्थ आणि परदेशी चलन जप्त

**<><><><><>**

राज्याच्या विविध भागात अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केंद्रीय पथकानं आज केली.

**सोलापूर** जिल्ह्यात दक्षिण सोलापूर तालुक्यात बडकबाळ आणि हत्तूर आणि उत्तर सोलापूरच्या तिऱ्हे आणि शिवणी या गावांना भेट देऊन शेती, पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीचा आढावा केंद्रीय पथकानं घेतला.

**बीड** जिल्ह्यात केंद्रीय पथकानं आज पाहणीला सुरुवात केली. इथं ११ तालुक्यांमध्ये पिकांसह जमिनीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. तसंच पशुधन आणि घरांनाही मोठा फटका बसला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातही केंद्रीय पथकानं आज अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसलेल्या विविध भागांना भेट देऊन नुकसानीचा आढावा घेतला.

**<><><><><>**

राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी महायुतीतले तिन्ही पक्ष आपापल्या स्तरावर युतीसंदर्भातला निर्णय घेतील, मात्र तरीही या निवडणुका आपण एकत्रितपणेच लढवणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज कोल्हापुरात बातमीदारांशी बोलत होते. या निवडणुकीत जनता महायुतीलाच कौल देईल असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**- - होल्ड - बाईट - मुख्यमंत्री - -**

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आज छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर आहेत. पैठण तालुक्यातल्या नांदरा गावी त्यांनी अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांशी संवाद साधला. आपण मुख्यमंत्री असताना सरसकट कर्जमाफी केली होती. महायुती सरकारनं अतिवृष्टी, पूर बाधित शेतकरी, व्यापारी, नागरिक यांना दिवाळीपूर्वी अतिवृष्टीच्या पॅकेजचं आश्वासन दिलं होतं. मात्र, त्यांनी ते आश्वासन पाळलं नसल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली. दरम्यान, उद्धव ठाकरे हे केवळ भाषणबाजी करतात, विकासावर बोलत नाहीत, असं प्रत्युत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे.

<><><><><>

ठाणे जिल्ह्यातल्या उत्तन ते विरार या सागरी मार्गाचा विस्तार पालघर जिल्ह्यात वाढवण बंदरापर्यंत करायला काल राज्य सरकारने मान्यता दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पाची एकूण लांबी ५५ किलोमीटर १२ मीटर इतकी असून त्यापैकी २४ किलोमीटर ३५ मीटर इतका मुख्य सागरी पूल तसंच उत्तन, वसई आणि विरारला जोडणारे रस्ते यांचा समावेश आहे. या विस्तारामुळे पश्चिम द्रुतगती महामार्ग, स्वामी विवेकानंद मार्ग आणि लिंक रोडवरचा वाहतुकीचा ताण कमी होईल, असं फडणवीस या बैठकीत म्हणाले.

<><><><><>

बिहारच्या निवडणुकीत यश मिळणार नाही हे लक्षात आल्यावर काँग्रेस नेता राहुल गांधींनी हरियाणातला बनावट मतदारांचा मुद्दा उपस्थित केल्याची टीका केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेते किरेन रिजीजू यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत केली. हरियाणात काँग्रेसचा पराभव झाल्याबद्दल राहुल गांधी भाजपाला दोष देत आहेत. मात्र काँग्रेस अंतर्गत

विसंवादामुळे त्यांचा पराभव झाल्याचं त्यांच्याच नेत्या कुमारी शैलजा यांनी सांगितलं होतं, असं रिजीजू म्हणाले.

त्याआधी लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेत हरियाणा विधानसभा निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचे आरोप केले. हरियाणा विधानसभा निवडणुकीत २५ लाख बनावट मतदार तयार करण्यात आले, असा गंभीर आरोप गांधी यांनी केला. यावेळी एकाच छायाचित्राच्या नावासमोर वेगवेगळी नावं असल्याचं गांधी यांनी निदर्शनास आणून दिलं. तसंच दुबार मतदार आणि मतदारांचे चुकीचे पत्ते मतदार यादीत नोंदवले गेल्याचा आरोप केला.

<><><><>

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचा प्रचार काल संध्याकाळी संपला.

बिहार विधानसभा निवडणुकीच्या या टप्प्यात १८ जिल्ह्यातल्या १२१ विधानसभा मतदारसंघांमध्ये उद्या मतदान होणार आहे. एकंदर एक हजार ३१४ उमेदवारांचे राजकीय भवितव्य तीन कोटी ७५ लाखांहून अधिक मतदार ठरवतील. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी, एनडीए आणि महाआघाडीच्या नेत्यांनी आपापल्या पक्षाच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न केले. निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार, पहिल्यांदाच प्रत्येक मतदारसंघात एक निरीक्षक तैनात केला जाणार असून निवडणूक प्रक्रियेवर बारकाईनं लक्ष ठेवण्यासाठी सर्व मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग होणार आहे. पुरेशा प्रमाणात केंद्रीय सशस्त्र पोलिस दल देखील तैनात केले जाईल.

<><><><>

अमूल आणि इफको या भारताच्या सहकार क्षेत्रातल्या कंपन्यांनी, जागतल्या आघाडीच्या सहकारी संस्था म्हणून स्थान मिळवलं आहे. इंटरनॅशनल कोऑपरेटिव्ह अलायन्स वर्ल्ड कोऑपरेटिव्ह मॉनिटर या संस्थेनं यासंबंधीची २०२५ या वर्षासाठीची यादी अलिकडेच जाहीर केली. त्यात अमूलनं पहिलं तर इफकोनं दुसरं स्थान पटकावलं. दरडोई सकल देशांतर्गत उत्पादनाअंतर्गतच्या कामगिरीच्या आधारावर या कंपन्यांनी हे यश प्राप्त केलं.

या यशासाठी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी दोन्ही कंपन्यांचं अभिनंदन केलं आहे. हे यश म्हणजे अमूलशी जोडलेल्या लाखो महिलांच्या अथक

समर्पणाचा आणि इफकोत योगदान दिलेल्या शेतकऱ्यांच्या मेहनतीचा गौरव आहे. हे यशातून सहकार क्षेत्राच्या अमर्याद क्षमतांची प्रचिती येते असं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

क्यूएस जागतिक विद्यापीठ क्रमवारी आशिया २०२६मध्ये आयआयटी दिल्लीनं देशस्तरावर पहिलं, तर जागतिक स्तरावर ५९वं स्थान मिळवलं आहे. आयआयटी मुंबई १२९व्या, आयआयटी मद्रास १८०व्या, तर आयआयटी खरगपूर २१५व्या स्थानावर आहे. आयआयएमसी बेंगलोरला २१९, तर आयआयटी कानपूर २२२वं स्थान देण्यात आलं आहे. दिल्ली विद्यापीठाचा समावेश पहिल्या ३५० संस्थांमध्ये झाला आहे. यंदाच्या क्रमवारीत देशातल्या ५४ शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे.

<><><><><>

शीख धर्माचे संस्थापक गुरु नानक यांची आज 5 शे 56 वी जयंती आज साजरी होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुनानक जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. गुरु नानक यांचं जीवन आपल्याला सत्य, न्याय आणि सहिष्णुता या मूल्यांची शिकवण देतं; प्रत्येकाने गुरु नानक देव यांचे आदर्श आपल्या जीवनात आत्मसात करावे आणि समृद्ध राष्ट्र निर्माण करण्यासाठी त्यांनी दाखवलेल्या मार्गाचे अनुसरण करावे असं आवाहनही राष्ट्रपती मुर्मू यांनी आपल्या संदेशात केलं आहे. गुरु नानक देवांचं जीवन आणि संदेश मानवतेला चिरस्थायी मार्गदर्शन आणि प्रेरणा देणारा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

नांदेडच्या गुरु गोविंदसिंह गुरुद्वारासह राज्यातल्या विविध गुरुद्वारांमधे गुरु नानक जयंती निमित्त लंगर, भजन, कीर्तन अशा विविध कार्यक्रमांचं आयोजंन करण्यात आलं आहे.

कार्तिक पौर्णिमा म्हणजेच त्रिपुरारी पौर्णिमा आज सर्वत्र श्रद्धापूर्वक पारंपरिक पद्धतीने साजरी होत आहे. त्यानिमित्त ठिकठिकाणी दीपोत्सवांच आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><><>

मुंबई विमानतळावर सीमाशुल्क विभागाच्या पथकानं गेल्या चार दिवसांत केलेल्या कारवाईत अंमली पदार्थाचा मोठा साठा जप्त केला आहे. या कारवाई दरम्यान विविध उड्डाणांमधून आलेल्या पाच प्रवाशांकडून १३ किलोहून अधिक अंमली पदार्थ आणि सुमारे

८७ लाख रुपये किमतीचं परदेशी चलन जप्त करण्यात आलं आहे. संबंधित प्रवाशांना अटक करण्यात आली आहे.

<><><><><>

नौदलाच्या मोठ्या टेहेळणी जहाजांच्या श्रेणीतलं तिसरं जहाज इक्षक हे उद्या कार्यान्वित होणार आहे. कोची इथं समारंभपूर्वक या जहाजाचा भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल होऊन हे जहाज नौदलाच्या दक्षिण कमांडमधे तैनात होणार आहे.

कोलकाता इथल्या गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनियर्स लिमिटेडनं बांधलेल्या या जहाजात ८० टक्क्यांपेक्षा जास्त स्वदेशी सामग्रीचा वापर झाला आहे.

बंदरं, जहाजांचे तळ आणि खोल समुद्रातल्या नौवहन मार्गांच्या टेहळणीसाठी हे जहाज उपयुक्त ठरेल. यादृष्टीनं हे जहाज अत्याधुनिक उपकरणं, स्वनियंत्रित पाणबुडी, रिमोट आधारीत नौका, सर्वेक्षणासाठीच्या मोटार बोटी अशा सुविधांनी सज्ज आहे. यासोबतच जहाजावर हेलिकॉप्टर डेकची सोयही उपलब्ध आहे.

/<><><><><>//